# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५२३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—२०/०८/२०१६

**१)लोखंडी सलाखीची चोरी :—**

दिनांक १८/०८/२०१६ रोजी १८.०० वा. ते १९/०८/२०१६ रोजी ०९.०० वा. दर. यातील फिर्यादी हसीबखान मुजीबखान वय ३९ वर्ष, रा. चिखला याचा वाटर टॅक बांधकामाकरीता ठेवलेली लोखंडी सलाख ०४ बंडल ३४५ किलो कि. ११,३८५ /—रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. बावने पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**२) ट्रॅक्टर चालकाच्या निष्काळजीपणामुळे एकाचा मृत्यु . :—**

दिनांक १९/०८/२०१६ रोजी १५.१५ वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मिनी ट्रॅक्टर भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन ट्रालीत बसलेला शाताराम चैताराम नेवारे वय २० वर्ष, रा. बपोरा हा ट्रॅक्टरचे खाली पडुन ट्रॉलीचे चाकाचे खाली येवुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी सोमेश्वर यशवंत नेवारे वय २३ वर्ष, रा. बपेरा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २७९,३०४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. जाईले पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलवरुन पडल्याने दोन जखमी . :—**

दिनांक १३/०८/२०१६ रोजी १२.४८ वा. दर. यातील जखमी आरोपी हा आपल्या मोटार सायकलने जखमी कोकीळा भोजराम कापगते वय १८ वर्ष, रा. पडसपाणी हीला घेवुन लाखनी कडे एनएच ६ रोडने येत असता त्याचे समोर लाखनीकडे जाणा—या अज्ञात ट्रक पासुन मर्यादीत अंतर न ठेवता स्वत:चे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, हयगयीने चालवुन समोरुन जाणा—या ट्रकला एनएच ०६ रो पिपंळगाव खैरी फाटा येथे स्वत: धडक मारली त्यामुळे स्वत: व मागे बसलेल्या मुलीला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने आघात रजिस्टर क्र. २०/१६ दि. १३/०८/२०१६ मध्ये नोंद घेवुन डॉ. रिपोर्ट व चौकशी अहवाला वरुन पो.स्टे. लाखनी येथे कलम २७९,३३८ भादंवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील चौकशी पोहवा. रामटेके पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**४) ट्रकने मोटार सायकलला धडक दिल्याने गंभिर जखमी . :—**

दिनांक १९/०८/२०१६ रोजी १९.०० ते १९.१५ वा. दर. यातील जखमी लिलाधर पाडुरंग शिवनकर वय ४० वर्ष, रा. पिपंळगाव खांबी हा पत्नी व मुलांसह आपल्या हिरो होंडा डिलक्स मोटार सायकल क्र. एमएच ३५ आर ३३२२ ने जात असतांना लाखांदुर कडुन साकोलीकडे जाणा—या यातील अज्ञात आरोपी ट्रक चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने हयगयीने, निष्काळजीपने चालवुन मोटार सायकलला सासरा पहाडी जवळ येथे धडक दिल्याने मोटार सायकलच्या चालक हा रोडवर पडुन गंभिर जखमी होण्यास, व त्याची पत्नी सोबत दोन्ही मुले जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी जितेन्द्र सुरेश डोंगरवार वय २८ वर्ष, रा. सासरा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. यादव पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.